# एक तपपूर्ती – "तालयोगी" आश्रमाची

विद्येचे माहेरघर समजले जाणारे पुणे शहर हे गेले कित्येक वर्षे शास्त्रीय संगीताचे देखील माहेरघर झाले आहे. अनेक दिग्गज मान्यवर कलावंतांनी पुणे ही त्यांची कर्मभूमी केली. गायनाचार्य विष्णू दिगंबर पलुसकर यांच्यापासून सुरु झालेली ही परंपरा आजतागायत चालू आहे. सध्याच्या काळातील प्रतिथयश मान्यवर गुरु तालयोगी पंडित सुरेश तळवलकर यांनी पण एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला पुणे ही त्यांची कर्मभूमी बनवली आहे. फार पूर्वीपासून म्हणजे साधारण १९७५ पासून गुरुजी (सुरेशजी) गुरु-शिष्य परंपरेनुसार त्यांच्या शिष्यांना तालीम देत आहेत. तेच विद्यादानाचे पवित्र बीज त्यांनी पुण्यात वास्तव्याला येऊन रोवलं आणि आज ते बहरलं आहे. हे कार्य अखंड चालू आहे. कालांतराने २०११ साली त्यांनी पुण्यात धायरी येथे "तालयोगी" आश्रमाची स्थापना केली. जगदगुरु शंकराचार्य श्री विद्यानृसिंह भारती करवीर पीठ आणि प.पू विष्णू महाराज पारनेरकर यांच्या शुभ हस्ते "तालयोगी" आश्रमाचे उदघाटन झाले. बघता बघता या आश्रमाला बारा वर्षे म्हणजे एक तप होत आहे. योगायोगाने गुरुजींचे अमृत महोत्सवी वर्ष सुध्दा चालू आहे. जेव्हापासून गुरुजींनी गुरु-शिष्य परंपरेनुसार विद्या दानाला सुरुवात केली तेव्हापासून अनेक कलाकार घडवलेले आहेत. तेच कार्य या आश्रमाद्वारे त्यांनी पुढे चालू ठेवले आहे. या आश्रमामध्ये फक्त तबलाबादकच नव्हे, तर कथक नर्तक, शास्त्रीय गायक, वाद्यवादक, भारतीय तसेच पाश्चिमात्य इतर तालवाद्य वादक यांना गुरुजींकडून नियमितपणे तालीम मिळत असते. नुसतीच तालीम देण्यापुरते गुरुजींचे काम नसून त्यांना कलाकार म्हणून घडविण्याचे कार्य या आश्रमातून होत आहे.

कलाकार घडविण्याच्या या प्रक्रियेमध्ये शिष्याला गुरुंचा जास्तीत जास्त सहवास मिळणे गरजेचे असते. या सहवासातून कलेचे संस्कार शिष्यापर्यत पोहोचत असतात. सर्वच गुरु आपापल्या शिष्यांना त्या त्या कलेचे शास्त्र समजावून सांगत असतात, तंत्र शिकवत असतात, विद्या देत असतात. या सर्वांचे कलेमध्ये रुपांतर होण्याकरिता जे संस्कार शिष्याला मिळण्याची गरज असते ते संस्कार गुरुच्या सहवासातून अधिक मिळते. जे शिष्य तालयोगी आश्रमामध्ये वास्तव्याला असून गुरु-शिष्य परंपरेत शिकतात, त्यांना गुरुजींच्या सहवासातून कलेचे नियमित संस्कार मिळतात आणि शिष्याची विद्यार्थी दशेपासून कलाकार होण्यापर्यतची प्रक्रिया घडत जाते.

गुरुजींचा जवळपास संपूर्ण दिवस आश्रमामध्ये व्यतित होत असतो. आश्रमामध्ये फक्त तबला आणि पखवाज वादक विद्यार्थी नसून सर्व प्रकारचे म्हणजे इतर तालवाद्य वादक, वाद्य वादक, गायक, नर्तक इतकेच नाही तर पाश्चिमात्य वाद्यवादक देखील एकत्रित तालीम घेत असतात. इथे एकत्रित तालीम मिळत असल्यामुळे या विद्यार्थ्यांवर फक्त तालाचे संस्कार होत नसून संपूर्ण संगीताचे संस्कार होत असतात. या विद्यार्थ्यांच्या सांगितीक कक्षा जागतिक पातळीवर विस्तारल्या आहेत. ज्यामुळे परिपूर्ण कलाकार घडण्यास मदत होते. एकमेकांच्या सोबतीत आश्रमातील विद्यार्थ्यांचा संपूर्ण दिवस केवळ आणि केवळ संगीतमय असतो. एकत्र राहिल्यामुळे रियाजाला चालना मिळते, अन्य व्यक्तीला पण ऐकण्याचे संस्कार मिळतात. सोलो वादनाइतकेच साथ संगत कशी करावी याची तालीम यातूनच मिळते. त्यामुळे आश्रमातील अनेकोत्तम कलाकार, विद्यार्थी गायन, वादन व नृत्यासोबत साथसंगत करत आहेत.

अनेक सिध्दहस्त कलाकारांची आश्रमात लागलेली हजेरी ही या विद्यार्थ्यांसाठी परवणीच असते. अशा कलाकारांचा सहवास मिळणे हे दखिल भाग्यच असते. आश्रमातर्फे अनेक प्रकारचे सांगितीक उपक्रम राबविले जातात. ज्यामध्ये आश्रमातील विद्यार्थी उत्साहाने सहभागी होतात. या उपक्रमांच्या निमित्ताने शिष्यांना त्यांची कला श्रोत्यांसमोर सादर करावयाची संधी आणि अनुभव मिळतो. आश्रमातील जेष्ठ विद्यार्थी या उपक्रमांची आखणी करत असतात. त्यातून त्यांना तोही अनुभव घेता येतो. थोडक्यात काय तर एक परिपूर्ण कलाकार तयार होतो.

आता या वर्षी ४ एप्रिल २०२३ ला आश्रमाला बारा वर्षे पूर्ण होत आहेत. हा तपपूर्ती सोहळ्याचा समारंभ बालगंधर्व रंगमंदिर येथे ४ एप्रिल २०२३ रोजी सादर होणार आहे. या सोहळयास जगदगुरु शंकराचार्य श्री विद्यानृसिंह भारती करवीर पीठ आणि विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर हे आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. या सोहळयामध्ये गुरुजींचे चिरंजीव आणि सध्याचे आघाडीचे तबला वादक श्री.सत्यजित तळवलकर यांचे तबला सोलो वादन तसेच गुरुजींचे परममित्र आणि विश्वविख्यात गायक पंडित उल्हास कशाळकर यांचे गायन सादर होणार आहे.

तालयोगी आश्रमाच्या तपपूर्तीच्या निमित्ताने मी गुरुजींना मन:पूर्वक अभिवादन करुन तालयोगी आश्रमाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. या आश्रमाच्या माध्यमातून भारतीय शास्त्रीय संगीताची गायन, वादन व नृत्याची परंपरा अखंड चालत राहो आणि अनेकोत्तम, गुणी कलाकार या आश्रमाच्या माध्यमातून घडोत अशी सदिच्छा व्यक्त करतो.

रामदास पळसुले